महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२०/ १०१ दिनांक :19 MAR 2020

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित पदविका/पदवी/पदयुत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
औरंगाबाद विभाग.

विषयः- **महाडीबीटी पोर्टलवरील लाभ वितरणाच्या कार्यवाही बाबत. . . .**
संदर्भः- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/७९, दिनांक २८/०२/२०२०

उपरोक्त विषयी महाराष्ट्र शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत (१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (०२) डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (०३) उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना (भाग-१, वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून) या योजना राबविण्यांत येत आहेत. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना वरील योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगीन मध्ये लाभाच्या पहिल्या हप्त्यासाठी रिडीम बटन प्राप्त झालेले/होणार आहे. अशा विद्यार्थ्यांना त्वरीत रिडीम बटनाचा वापर करण्याबाबत सूचना द्याव्यात. अन्यथा डीबीटी पोर्टलमार्फत लाभ वितरणाची कार्यवाही सुरु होणार नाही.

तसेच, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील दुस-या लाभा बाबत रिडीम बटनाचा वापर करण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात. सोबत संदर्भीय पत्राची प्रत जोडली आहे.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यांस्तव.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३ , महापालिका मार्ग पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी- २२६१७९६९ , फॅक्स - २२६९०००७
E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ - ई-मेलद्वारे / स्पीड पोस्टद्वारे**

क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/ ७९
दिनांक : २८/०२/२०२०

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

विषय : **महाडीबीटी पोर्टलवरील लाभ वितरणाच्या कार्यवाही बाबत...**
संदर्भ : या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/५५ दि.१४/०२/२०२०

महोदय,

**आपले सरकार डी.बी.टी.पोर्टल** ( संकेतस्थळ : **https://mahadbtmahait.gov.in** ) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला असून त्यामधील खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३) उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ( भाग-१, वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून )

सन २०१९-२० च्या **महाडीबीटी पोर्टलवरील** उपरोक्त योजनांच्या अंमलबजावणीसाठी, विद्यार्थी / संस्था / विभागीय कार्यालय यांना दिलेल्या मुदतवाढीबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सर्व विभागीय कार्यालयांना त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या संस्थांना व संस्थामार्फत त्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कळविण्याबाबत सूचित केले आहे. तसेच **"विद्यार्थी / संस्था / विभागीय कार्यालयांनी पोर्टलवर वेळोवेळी जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार आपापल्या स्तरांवरील कार्यवाही न चुकता पूर्ण करावी."** असेही कळविण्यात आलेले आहे.

या कार्यालयाकडून शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या व डीबीटी पोर्टलद्वारे अलॉटमेंट झालेल्या ज्या विद्यार्थ्यांचे **पहिल्या हप्त्याच्या लाभाचे** देयक जनरेट करुन, मंजूर देयकाची रक्कम महाडीबीटी पोर्टलद्वारे वितरणासाठी शासनाच्या सेंट्रल पूल खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहे अशा विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये लाभाच्या पहिल्या हप्ताची रक्कम प्राप्त करण्यासाठी, व्हाऊचर रिडीम करण्यासाठी उपलब्ध होते व विद्यार्थ्याकडून ते व्हाऊचर रिडीम केल्यानंतर डीबीटी पोर्टलमार्फत योजनेच्या लाभाची रक्कम विद्यार्थ्याच्या आधार संलग्नित /संस्थेच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येते. तसेच,

**पहिल्या हप्त्याची रक्कम प्राप्त झालेल्या विद्यार्थांना दुसऱ्या हप्त्याची रक्कम** प्राप्त होण्यासाठी संस्थेच्या लॉगीनमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती भरण्यासाठी यादी प्राप्त होते. ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती संस्थेकडून भरण्यात येते अशा विद्यार्थ्यांच्या **लाभाच्या दुसऱ्या हप्त्याच्या** रक्कमेचे देयक पोर्टलमार्फत जनरेट करून मंजूर देयकाची रक्कम शासनाच्या सेंट्रल पूल खात्यात विद्यार्थी / संस्था यांना वितरणासाठी जमा करण्यात येते व विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये दुसऱ्या हप्त्यासाठीचे व्हाऊचर रिडीम करण्यासाठी उपलब्ध होते व विद्यार्थ्याकडून ते व्हाऊचर रिडीम केल्यानंतर योजनेच्या लाभाची रक्कम विद्यार्थ्याच्या आधार संलग्नित / संस्थेच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येते.

तरी, याबाबत या पत्राच्या अनुषंगाने, सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांना व संस्थामार्फत त्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगीनमध्ये लाभाच्या पहिल्या हप्त्यासाठी रिडीम बटन प्राप्त झालेले / होणार आहे अशा विद्यार्थ्यांना **त्वरीत रिडीम बटनाचा वापर करण्याबाबत** सूचना द्याव्यात. अन्यथा डीबीटी पोर्टलमार्फत लाभ वितरणाची कार्यवाही सुरु होणार नाही. तसेच, संस्थांच्या लॉगीनमध्ये **लाभाच्या दुसऱ्या हप्त्यासाठी उपस्थिती अहवाल भरण्यासाठी** प्राप्त होत असलेल्या यादीमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती त्वरीत भरण्याबाबत ताकीद द्यावी, अन्यथा यामध्ये विलंबाबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

सोबत आजअखेर (दि. २८ फेब्रुवारी २०२०) पर्यंत डिबीटी डॅशबोर्ड रिपोर्ट नुसार विभागीय कार्यालयनिहाय पहिला हप्त्याच्या रिडिम बटनाचा वापर न केलेल्या विदयार्थांची संख्या व संस्थेकडून दुसऱ्या हप्त्यासाठीचा उपस्थिती अहवाल न भरलेल्या विदयार्थांच्या संख्येचा तक्ता जोडलेला आहे. सदर माहिती संबंधीत विभागीय कार्यालयाच्या व संबंधीत संस्थांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध असल्याने **याबाबतचा पाठपुरावा विभागीय कार्यालयांनी त्यांच्या स्तरावर वेळोवेळी करावा** जेणेकरुन कोणतीही कार्यवाही संस्था / विदयार्थी स्तरावर प्रलंबित राहाणार नाही व लाभ वितरणाची कार्यवाही जलद गतीने करता येईल.

आपला,

( डॉ. सु.प्र.वावलकर.)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

सोबत - वरीलप्रमाणे .

प्रत : माहितीसाठी सविनय सादर.

१) मा. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग,मंत्रालय विस्तार भवन, पाचवा मजला, मुंबई -३२.
२) मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,५ वा मजला,मंत्रालय ॲनेक्स बिल्डिंग, मादाम कामा रोड, मुंबई : ३२.

DBT Dashboard report-28-02-2020-

2018-19 AND 2019-20 -Status of Voucher Not Redeem and Attendance Pending for 2nd Installemnt.

| Division | Scheme | 2018-19 | | | 2019-20 | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Voucher Not Redeem | Pending At Institute (2nd Installment) | Voucher Not Redeem (2nd Installment) | Voucher Not Redeem | Pending At Institute (2nd Installment) |
| Amravati | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 0 | 14 | 0 | 81 | 0 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 0 | 16 | 0 | 0 | 458 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 0 | 60 | 4 | 0 | 0 |
| **Amravati Total** | | **0** | **90** | **4** | **81** | **458** |
| Aurangabad | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 0 | 68 | 9 | 1,123 | 0 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 0 | 101 | 6 | 0 | 1,905 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 0 | 63 | 13 | 0 | 0 |
| **Aurangabad Total** | | **0** | **232** | **28** | **1,123** | **1,905** |
| Mumbai | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 0 | 15 | 6 | 103 | 0 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 0 | 129 | 8 | 0 | 4,145 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 0 | 164 | 6 | 0 | 0 |
| **Mumbai Total** | | **0** | **308** | **20** | **103** | **4,145** |
| Nagpur | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 0 | 22 | 2 | 60 | 0 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 0 | 51 | 1 | 0 | 969 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 0 | 62 | 3 | 0 | 0 |
| **Nagpur Total** | | **0** | **135** | **6** | **60** | **969** |
| Nashik | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 0 | 36 | 1 | 745 | 0 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 0 | 105 | 1 | 0 | 2,730 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 0 | 118 | 12 | 0 | 0 |
| Nashik Total | | **0** | **259** | **14** | **745** | **2,730** |
| Pune | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 0 | 211 | 24 | 2,780 | 0 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 0 | 256 | 21 | 0 | 8,179 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 0 | 173 | 9 | 0 | 0 |
| Pune Total | | **0** | 640 | 54 | 2,780 | 8,179 |
| Grand Total | | **0** | 1,664 | 126 | 4,892 | 18,386 |